**(अनुसूची ड)**

**(कलम ४५३ पहा)**

**प्रकरण १**

**निवडणूक नियम**

**खालील सुधारणांसह**

निवडणूक नियमात पुढीलप्रमाणे सुधारणा झालेल्या आहेत.

१. सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५३, कलम ३ अनुसूची

२. सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४

३. सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६

४. सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४

५. सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२

६. नं.इएलएन. १०९४/सीआर-३३/९४/युडी-३२, दिनांक ८ सप्टेंबर, १९९४, म.शा. रा. भाग १ अ मध्ये उप विभाग, दिनांक १ डिसेंबर, १९९४, पान ९८

७. "अनुसूची" या शीर्षकाऐवजी हे शीर्षक सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, क्र. ८ अन्वये देण्यात आले.

८. क्रमांक एम.एम.सी.२००२/८०/प्र.क्र.२८/२००२/नवि-३२, दिनांक १६/४/२००२, म.शा.रा., भाग १ अ मध्ये उप विभाग, असाधारण दिनांक १६ एप्रिल, २००२, पान नं. ६७ ते ७०

## नगरपालिका मतदारांची यादी

### १. मतदारांची यादी लोकांना पाहण्यासाठी ठेवणे-

नगरपालिका मतदारांच्या यादीच्या छापील प्रती लोकांना पाहण्यासाठी नगरपालिकेच्या मुख्य कार्यालयात आणि (राज्य निवडणूक आयुक्तांस किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास) आयुक्तास योग्य वाटेल अशा अन्य ठिकाणी ठेवल्या पाहिजेत.

### २. अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्यासाठी राखून ठेवलेल्या जागा नेमून देण्याची आणि आळीपाळीने देण्याची रीत-

कलम ५अ च्या पोट-कलम १ च्या खंड (अ) व (ब) यांच्या तरतुदींना अधीन राहून अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्यासाठी राखून ठेवलेल्या जागांच्या बाबतीत, अनुसूचित जातीच्या किंवा अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येची टक्केवारी ज्या प्रभागाच्या एकूण लोकसंख्येच्या संबंधात सर्वात अधिक असेल अशा प्रभागापासून सुरुवात करून उतरत्या क्रमाने जागा नेमून देण्यात येतील.

**स्पष्टीकरण:-** जागांच्या संख्येची गणना करताना तेव्हा जागेचा एकद्वितीयांश किंवा त्याहून अधिक भाग हा एक भाग म्हणून मोजण्यात येईल आणि एक द्वितीयांशापेक्षा कमी भागाकडे दुर्लक्ष केले जाईल.

## ३. नागरिकांच्या मागासवर्गाकरिता राखून ठेवलेल्या जागा नेमून देण्याची आणि आळीपाळीने देण्याची रीत, -

कलम ५-अ, पोट-कलम (१) च्या खंड (क) च्या तरतुदींना अधीन राहून नागरिकांच्या मागासवर्गाकरिता राखून ठेवावयाच्या जागा प्रभागांना चिठ्ठया काढयून नेमून देण्यात येतील;

परंतु, नंतरच्या निवडणुकीच्यावेळी, शहरातील ज्या प्रभागांमध्ये अगोदरच्या निवडणुकीमध्ये नागरिकांच्या मागासवर्गाच्या प्रवर्गाकरिता अशा कोणत्याही जागा राखून ठेवलेल्या नसतील त्या जाईपर्यंत, असे आरक्षण आळीपाळीने देण्यात येईल.

परंतु आणखी असे की, चिठ्ठया काढण्याच्या वेळी, अनुसूचित जातींसाठी व अनुसूचित जमातींसाठी आधीच राखून ठेवलेल्या जागा वगळण्यात येतील.

**स्पष्टीकरण:-** जागांच्या संख्येची गणना करताना तेव्हा जागेचा एकद्वितीयांश किंवा त्याहून अधिक भाग हा एक भाग म्हणून मोजण्यात येईल आणि एक द्वितीयांशापेक्षा कमी भागाकडे दुर्लक्ष केले जाईल.

## ४. स्त्रियांकरिता राखून ठेवलेल्या जागा नेमून देण्याची आणि आळीपाळीने देण्याची रीत.-

कलम ५ अ च्या पोट-कलम (१) मधील खंड (ड) च्या तरतुदींना अधीन राहून, स्त्रियांकरिता राखून ठेवावयाच्या जागा पुढील तत्वांनुसार नेमून देण्यात येतील व आळीपाळीने देण्यात येतील.

(१) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा यथास्थिती नागरिकांच्या मागासवर्गाचा प्रवर्ग यांतील स्त्रियांसाठी ज्या वेगवेगळया प्रभागांमध्ये जागा राखून ठेवण्यात आल्या असतील त्या प्रभागांना अशा राखून ठेवलेल्या जागांमधून चिठ्ठया काढून अशा जातींसाठी, जमातींसाठी किंवा प्रवर्गासाठी जागा नेमून देण्यात येतील;

परंतु, अशा जागा या, अशा जातींकरिता किंवा जमातींकरिता किंवा प्रवर्गाकरिता जेथे जागा राखून ठेवावयाच्या असतील अशा प्रभागांमध्येच फक्त नेमून देण्यात येतील.

परंतु, आणखी असे की, नंतरच्या निवडणुकीच्या वेळी, गावातील वेगवेगळया प्रभागांना अशा जागा आळीपाळीने देताना अशा जातीच्या, जमातींच्या किंवा यथास्थिती प्रवर्गाच्या स्त्रियांकरिता अगोदरच्या निवडणुकांमध्ये ज्या प्रभागात अशा जागा आधीच राखून ठेवलेल्या होत्या ते प्रभाग, अशा जागा जेथे राखून ठेवणे आवश्यक असेल त्या सर्व प्रभागांना असे आरक्षण आळीपाळीने दिले जाईपर्यंत वगळण्यात येतील.

(२) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा नागरिकांच्या मागासवर्गाचा प्रवर्ग यामधील स्त्रियांसाठी, समुचित प्रभागांमध्ये एकदा जागा राखून ठेवल्यानंतर स्त्रियांसाठी असलेल्या उर्वरित जागा वेगवेगळया प्रभागांमध्ये चिठ्ठया काढून त्याद्वारे राखून ठेवण्यात येतील.

परंतु, नंतरच्या निवडणुकीच्यावेळी, वेगवेगळया प्रभागांना अशा जागा आळीपाळीने देताना, अगोदरच्या निवडणुकीमध्ये ज्या स्त्रियांसाठी जागा राखून ठेवलेल्या होत्या ते प्रभाग गावातील सर्व प्रभागांना आळीपाळीने असे आरक्षण दिले जाईपर्यंत वगळण्यात येतील;

(३) एखाद्या महानगरपालिकेमध्ये अनुसूचित जातींसाठी, अनुसूचित जमातींसाठी किंवा यथास्थिती नागरिकांच्या मागासवर्गाच्या प्रवर्गासाठी केवळ जागा राखून ठेवलेली असेल त्या बाबतीत अशी जागा, पहिल्या निवडणुकीपासून सुरु होणाऱ्या, लागोपाठच्या तीन निवडणुकांमध्ये एकदा, चिठ्ठया काढून स्त्रियांसाठी नेमून देण्यात येईल.

(४) एखाद्या महानगरपालिकेमध्ये फक्त दोन जागा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा, यथास्थिती, नागरिकांच्या मागासवर्गाचा प्रवर्ग यांच्यासाठी राखून ठेवलेल्या असतील, त्याबाबतीत त्या दोन जागांपैकी एक जागा, पहिल्या निवडणुकीपासून, सुरु होणाऱ्या तीन निवडणुकांपैकी दोन निवडणुकांमध्ये चिठ्ठया काढून स्त्रियांना नेमून देण्यात येईल.

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**

**क्रमांक-एसईसी/एमसी/२००१/प्र.क्र.४५/का-१०,, दिनांक- ८ नोव्हेंबर, २००१**

प्रति,
विभागीय आयुक्त (सर्व)
महानगरपालिका,
ठाणे/उल्हासनगर/पुणे/पिंपरी-चिंचवड/सोलापूर/नाशिक/अकोला/अमरावती/नागपूर

विषय:- महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुका २००२ बहुसदस्यीय प्रभागांच्या आरक्षणासंदर्भात चिठ्ठी पध्दतीची सोडत काढण्याबाबत...

संदर्भ:- १) राज्य निवडणूक आयोगाकडील दिनांक १९/१०/२००१ चे समक्रमांकाचे पत्र

२) महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक-३४/२००१, दिनांक- ७ नोव्हेंबर, २००१

महोदय,

उपरोक्त नमूद अध्यादेश क्र. ३४/२००१ अन्वये नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ मधील संबंधित तरतुदींमध्ये बदल करून बहुसदस्यीय पध्दतीने निवडणूक घेण्यासंदर्भात सुधारणा करण्यात आल्या आहेत. बहुसदस्यीय पध्दतीने निवडणूक घेण्याच्या दृष्टीने जागांचे आरक्षण करताना अनुसूचित जातीव अनुसूचित जमाती यांच्यासाठी करावयाचे जागांचे आरक्षण लोकसंख्येच्या टक्केवारीनुसार तर नागरिकांच्या मागासवर्गासाठी तसेच महिला (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांच्या मागासवर्गातील महिलांसह) यांच्यासाठी करावयाचे आरक्षण चिठ्ठी पध्दतीने करावयाचे आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमांतर्गत निवडणूक नियमांमध्ये जरी जागांच्या आरक्षणासंदर्भातील नियमांचा समावेश असला तरी सदर नियम एक सदस्यीय निवडणूक पध्दतीस अनुसरून तयार करण्यात आले होते. आता त्यामध्ये बदल करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन आहे. त्याशिवाय, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ अंतर्गत निवडणूक नियमांमध्ये आरक्षणाविषयीच्या तरतुदी समाविष्ट नाहीत. यास्तव, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ तसेच नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ मधील आरक्षण, जागा आळीपाळीने नेमून देणे या संदर्भातील नियम शासनाकडून तयार करण्यात येत आहेत. तत्पूर्वी सार्वत्रिक निवडणुकांचा कार्यक्रम लवकरच जाहीर करावयाचा असल्यामुळे व सदर कार्यक्रम जाहीर करण्यापूर्वी जागा आरक्षित करण्यासाठी चिठ्ठी पध्दतीची सोडत काढावी लागणार असल्यामुळे त्या संदर्भातील सूचना खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

**(१) अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्यासाठी जागांचे आरक्षण-**

(१) संदर्भाधीन पत्राद्वारे देण्यात आलेल्या सूचनांनुसार अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्यासाठी आरक्षित असलेल्या जागा व प्रभागांची संख्या सारखी असेल तर प्रत्येक प्रभागात अनुसूचित जाती तथा अनुसूचित जमाती यांचेसाठी प्रत्येकी एक जागा नेमून देण्यात यावी. अनुसूचित जाती तथा जमाती यांच्यासाठी आरक्षित असलेल्या जागा प्रभागाच्या संख्येपेक्षा कमी असल्यास प्रभागाच्या लोकसंख्येशी अनुसूचित जाती तथा जमातीच्या लोकसंख्येची टक्केवारी काढून सर्वात जास्त टक्केवारी असलेल्या प्रभागापासून सुरुवात करून उतरत्या क्रमाने जागा राखून ठेवण्यात याव्यात. अनुसूचित जाती तथा अनुसूचित जमाती यांच्यासाठी राखीव ठेवावयाच्या जागा प्रभागाच्या संख्येपेक्षा जास्त असल्यास

प्रत्येक प्रभागात एक जागा नेमून देण्यात यावी व उरलेल्या जागा सर्वात जास्त लोकसंख्येच्या टक्केवारीच्या प्रभागापासून सुरुवात करून उतरत्या क्रमाने नेमून देण्यात याव्यात.

(२) वरीलप्रमाणे प्रत्येक प्रभागात नेमून दिलेल्या जागांचा १अ, २अ, ३अ असे अनुक्रमांक द्यावेत. एकाच प्रभागात अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींसाठी लोकसंख्येच्या टक्केवारीनुसार जागा राखीव ठेवाव्या लागत असल्यास अनुसूचित जातीच्या जागेस १अ, असा क्रमांक द्यावा तर अनुसूचित जमातीच्या जागेस १ब, असा क्रमांक द्यावा. एखाद्या प्रभागात फक्त अनुसूचित जमातींसाठी जागा राखीव ठेवावयाची असल्यास त्या जागेस १अ, २अ असे क्रमांक द्यावेत.

(३) अनुसूचित जाती तथा अनुसूचित जमातीच्या महिलांसाठी जागा राखून ठेवण्याबाबत:-

अनुसूचित जातीसाठी राखीव असलेल्या जागांना वरीलप्रमाणे अंक देऊन ज्या जागा राखीव ठेवण्यात आल्या असतील त्यामधून अनसूचित जातीच्या महिलांसाठी जागा आरक्षित ठेवावयाच्या आहेत. यास्तव अनुसूचित जातीसाठी राखीव ठेवण्यात आलेल्या जागांमधून चिठ्ठया काढून आवश्यक तितक्या जागा अनुसूचित जातीच्या महिलांसाठी राखीव ठेवण्यात याव्यात. त्याचप्रमाणे अनुसूचित जमातीसाठी राखीव ठेवलेल्या जागांमधून आवश्यक तितक्या जागा अनुसूचित जमातीच्या महिलांसाठी चिठ्ठया काढून राखीव ठेवण्यात याव्यात. अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीसाठी एकाच प्रभागात जागा आरक्षित झाल्या असल्यास अनुसूचित जमातीच्या महिलांसाठी जागा चिठ्ठी पध्दतीने आरक्षित करताना शक्यतोवर अनुसूचित जातीच्या महिलांसाठी आरक्षित झालेले प्रभाग वगळावेत. जेणेकरून, प्रत्येक प्रभागात शक्यतोवर एक जागा महिलांसाठी राखीव राहील. तथापि, चिठ्ठी पध्दतीच्या सोडतीमुळे ज्या प्रभागांमध्ये अनुसूचित जमातीसाठी जागा राखीव ठेवावयाची आहे, ती ठेवताना सदर प्रभागांमध्ये आधीच अनुसूचित जातीच्या महिलांसाठी जागा नेमून देण्यात आली असल्यास एका प्रभागात (महिलांसाठी ) अनुसूचित जाती तसेच जमाती जागा राखून ठेवण्यास हरकत नाही.

**(२) नागरिकांच्या मागासवर्गासाठी जागा आरक्षित करण्याबाबत :-**

(१) नागरिकांच्या मागासवर्गातील जागा राखीव ठेवताना त्या चिठ्ठी पध्दतीने ठेवावयाच्या असल्या तरी शक्यतोवर एका प्रभागात एकापेक्षा जास्त जागा नागरिकांच्या मागासवर्गासाठी ठेवण्यात येऊ नयेत. राज्य निवडणूक आयोगाकडील संदर्भाधीन पत्राद्वारे कळविल्यानुसार प्रत्येक प्रभागातील जागांना १अ, १ब, १क व गरज असल्यास १ड असे क्रमांक देण्यात आलेले आहेत. त्यामधून "क" क्रमांकाची प्रत्येक प्रभागातील एक जागा नागरिकांच्या मागासवर्गासाठी चिठ्ठी पध्दतीची सोडत काढताना विचारात घ्यावी.

म्हणजेच एखाद्या महानगरपालिकेमध्ये बहुसदस्यीय पध्दतीचे ३५ प्रभाग असल्यास १क ते ३५क अशा ३५ चिठ्ठ्या करून त्यामधून चिठ्ठी उचलून नागरिकांच्या मागासवर्गासाठी जागा राखीव ठेवण्यात याव्यात.

**(२) नागरिकांच्या मागासवर्गातील महिलांचे आरक्षण:-**

नागरिकांच्या मागासवर्गासाठी आरक्षितझालेल्या प्रभागामधून आवश्यक तेवढया जागा नागरिकांच्या मागासवर्गातील महिलांसाठी आरक्षित ठेवावयाच्या आहेत. तसेच प्रत्येक प्रभागात शक्यतोवर एक जागा महिलांसाठी आरक्षित ठेवली जाईल, अशा रीतीने आरक्षण ठेवावयाचे आहे. नागरिकांच्या मागासवर्गातील महिलांचे आरक्षण करताना चिठ्ठी पध्दतीने ज्या जागा नागरिकांच्या मागासवर्गासाठी राखीव झालेल्या आहेत, त्या विचारात घ्यावयाच्या आहेत. तथापि, असे करताना ज्या प्रभागात वरीलप्रमाणे अनुसूचित जाती अथवा अनुसूचित जमातीच्या महिलांसाठी जागा आरक्षित झाली असेल, असे प्रभाग शक्यतोवर वगळून उर्वरित जागांमधून नागरिकांच्या मागासवर्गातील महिलांसाठी आवश्यक तेवढया जागा चिठ्ठी पध्दतीने आरक्षित करण्यात याव्यात.

**(३) सर्वसाधारण महिलांसाठी जागा आरक्षित ठेवण्याबाबत:-**

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांचा मागासवर्ग यासाठी जागांचे आरक्षण झाल्यावर सर्वसाधारण महिलांसाठी जागा आरक्षित ठेवावयाच्या आहेत. महिलांसाठी जागा आरक्षित झालेले (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांच्या मागासवर्गातील महिला) प्रभाग वगळता उर्वरित प्रभागांची संख्या (ज्या प्रभागात किमान एक जागा अराखीव उरली आहे असे प्रभाग) व सर्वसाधारण महिलांसाठी आरक्षित करावयाच्या जागांची संख्या सारखी असल्यास प्रत्येक प्रभागातील सर्वसाधारण जागेपैकी शक्यतोवर एक जागा सर्वसाधारण महिलांसाठी आरक्षित ठेवण्यात यावी. महिलांसाठी आरक्षित झालेले प्रभाग वगळता उर्वरित प्रभागांची संख्या (ज्या प्रभागात किमान एक जागा अराखीव उरली आहे असे प्रभाग) सर्वसाधारण महिलांच्या संख्येपेक्षा जास्त असल्यास उर्वरित प्रभागातील एक सर्वसाधारण जागा चिठ्ठी पध्दतीच्या सोडतीसाठी विचारात घेऊन त्यामधून चिठ्ठ्या काढून सर्वसाधारण महिलांसाठी जागा आरक्षित करण्यात याव्यात. उर्वरित प्रभागांची संख्या सर्वसाधारण महिलांच्या संख्येपेक्षा कमी असल्यास उर्वरित प्रभागांपैकी प्रत्येक प्रभागात एक जागा सर्वसाधारण महिलांसाठी आरक्षित ठेवण्यात यावी व उर्वरित जागा चिठ्ठी पध्दतीने अराखीव जागांमधून एका प्रभागात दोनपेक्षा जास्त महिला येणार नाहीत याची दक्षता घेऊन राखीव ठेवण्यात याव्यात.

एका प्रभागात एकापेक्षा जास्त महिला सदस्य राखीव ठेवताना चार सदस्यीय प्रभाग असल्यास त्यांना प्राधान्य देण्यात यावे.

(४) चिठ्ठी पध्दतीची सोडत काढल्यानंतर जे प्रभाग विविध प्रवर्गासाठी राखीव झालेले आहेत, त्या प्रभागांची नावे नागरिकांना वाचून दाखविण्यात यावीत, जेणेकरून नागरिकांमध्ये संभ्रम राहणार नाही.

चिठ्ठी पध्दतीची सोडत काढल्यानंतर राखीव जागांचा तपशील राज्य निवडणूक आयोगास सोबत जोडलेल्या नमुन्यात पाठविण्यात यावा.

(बी. जी. वीर)
सचिव, राज्य निवडणूक आयोग

## पालिका सदस्यांच्या निवडणुका

**७. नामनिर्देशनांच्या तारखा.-**

(१) लगत पूर्ववर्ती सार्वत्रिक निवडणुकांत निवडून आलेल्या पालिका सदस्यांचा पदावधी कलम ६ अन्वये ज्या तारखेस संपणार असेल त्या तारखेच्या निकटपूर्वीच्या तीन महिन्यातील जे दिवस [६] [राज्य निवडणूक आयुक्तास किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास ] योग्य वाटतील त्या दिवशी पालिका सदस्यांच्या प्रभागाच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी उमेदवारांची नामनिर्देशनपत्रे सादर करण्यात येतील असे [६] [राज्य निवडणूक आयुक्ताकडून किवा त्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याकडून ] ठरविण्यात आले पाहिजे.

(२) नैमित्तीक रिकाम्या जागा निर्माण झाल्यानंतर सोयीप्रमाणे शक्य तितक्या लवकर आयुक्तास योग्य वाटेल अशा दिवशी अशा रिकाम्या जागा भरण्यासाठी घ्यावयाच्या निवडणुकांसाठी उमेदवारांची नामनिर्देशनपत्रे सादर करण्यात येतील असे [६][राज्य निवडणूक आयुक्ताकडून किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याकडून] ठरविण्यात आले पाहिजे.

**[८][८. प्रभागातील निवडणुकांमध्ये उमेदवारांच्या नामनिर्देशनासाठी निश्चित केलेल्या दिवसासाठीची द्यावयाची नोटीस.-**

राज्य निवडणूक आयोगाने निवडणुकीच्या कार्यक्रमाची नोटीस प्रसिध्द करण्याचा दिनांक हा प्रभाग याद्यांचे अधिप्रमाणन झाल्यापासून आठव्या दिवसानंतरचा नसेल. राज्य निवडणूक आयोग राजपत्रातून आणि तसेच कमीत कमी दोन स्थानिक वृत्तपत्रांमधून अशी तारीख प्रसिध्द करील.]

८[९. **उमेदवाराच्या नामनिर्देशनासंबंधीच्या तरतुदी.-** (१) अधिनियमाच्या तरतुदींनुसार पालिका सदस्य म्हणून निवडणूक लढविण्यास जी व्यक्ती अर्ह असेल तिला प्रभाग निवडणुकीतील उमेदवार म्हणून नामनिर्देशन करता येईल.

(२) प्रत्येक नामनिर्देशनपत्राचा नमुना राज्य निवडणूक आयोगाकडून विहित करण्यात येईल. तो राज्य निवडणूक आयोगाकडून निश्चित करण्यात येईल अशी किंमत दिल्यावर, निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडून कोणत्याही मतदाराला पुरविण्यात येईल.

(३) संभाव्य उमेदवार यथोचितरित्या भरलेली नामनिर्देशनपत्रे, संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे, नामनिर्देशनपत्रे दाखल करण्याच्या पहिल्या दिवसापासूनच्या पहिल्या सात दिवसात सकाळी ११ ते दुपारी ३.०० या वेळेत आणि नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी म्हणजे

आठव्या दिवशी सकाळी ११.०० ते दुपारी २.०० या वेळेत एकतर स्वत: किंवा त्याच्या प्रस्तावकाद्वारे किंवा अनुमोदकाद्वारे सादर करील.

(४) जी कोणतीही व्यक्ती, मतदान करण्यास अर्ह असेल आणि उमेदवाराला ज्या प्रभागातून नामनिर्देशन करावयाचे असेल त्या प्रभागाच्या मतदार यादीत जिच्या नावाचा समावेश असेल, अशा व्यक्तीला प्रस्तावक किंवा अनुमोदक म्हणून त्यावर स्वाक्षरी करता येईल.

परंतु, अशा कोणत्याही मतदाराला प्रस्तावक किंवा यथास्थिती, अनुमोदक म्हणून एकापेक्षा अधिक नामनिर्देशनपत्रांवर स्वाक्षरी करता येणार नाही.

परंतु, आणखी असे की, जर एखादा मतदार प्रस्तावक म्हणून किंवा यथास्थिती, अनुमोदक म्हणून एकापेक्षा अधिक नामनिर्देशनपत्रांवर स्वाक्षरी करील तर निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला मिळालेले पहिले नामनिर्देशनपत्र वगळता, अशी सर्व नामनिर्देशनपत्रो अवैध मानण्यात येतील आणि निर्वाचन अधिकाऱ्याकडून ती नाकारली जाण्यास पात्र असतील.

परंतु, असेही की, एकाच उमेदवाराला एकापेक्षा अधिका मात्र चारपेक्षा अधिक नसतील इतकी वेगवेगळया प्रस्तावकांनी व अनुमोदकांनी स्वाक्षरी केलेली नामनिर्देशनपत्रे त्याच जागेसाठी दाखल करता येतील.

(५) उमेदवार निवडणूक लढवित असलेली जागा ही, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा नागरिकांचा मागासवर्ग यांच्यासाठी राखीव जागा असेल तर तो ज्या विशिष्ट जातीचा असेल ती जात आणि ती उक्त जात, अनुसूचित जात किंवा यथास्थिती, अनुसूचित जमात किंवा नागरिकांचा मागासवर्ग म्हणून जाहीर करण्यात आली असल्याचे विनिर्दिष्ट करणारे प्रतिज्ञापत्र तो जोपर्यंत आपल्या नामनिर्देशनपत्रासोबत दाखल करीत नाही तोवर त्या जागेवर निवडणुकीला जाण्यास अर्ह असल्याचे समजण्यात येणार नाही.

(६) शहरातील एकापेक्षा अधिक प्रभागांमध्ये निवडणुका घेण्यात येत असतील तर, नामनिर्देशित करावयास यथोचितरित्या अर्ह असलेली एखादी व्यक्ती यापैकी कोणत्याही प्रभागांमधून निवडणूक लढवू शकेल.

परंतु, एकाच उमेदवाराला त्या प्रभागातील एकापेक्षा अधिक जागांसाठी निवडणूक लढविता येणार नाही.

(७) पोट-नियम (३) खालील नामनिर्देशनपत्र मिळाल्यावर, निवडणूक निर्णय अधिकारी, त्या नामनिर्देशनपत्राचा अनुक्रमांक आणि ज्या दिवशी व दिनांकी ते त्याला मिळाले तो दिवस व दिनांक यांची त्यावर नोंद करील. निवडणूक निर्णय अधिकारी नामनिर्देशनपत्र देणाऱ्या व्यक्तीलाही

नामनिर्देशनपत्रांया छाननीसाठी निश्चित केलेला दिवस, वेळ व ठिकाण याबाबत कळवील आणि अशा प्रकारे कळविण्यात आले आहे असे प्रमाणित करील. निवडणूक निर्णय अधिकारी, आपल्या कार्यालयातील ठळक जागीही नामनिर्देशनपत्रांच्या छाननीसाठी निश्चित केलेला दिवस, वेळ व ठिकाण याबाबतची माहिती लावण्याची व्यवस्था करील.

(८) नामनिर्देशनपत्रांच्या छाननीचा दिनांक हा, नामनिर्देशनपत्रे सादर करण्याचा अंतिम दिनांकाच्या नंतरचा पुढील दिवस असेल. प्रत्येकी एक प्रस्तावक आणि रीतसर प्राधिकृत केलेली अन्य एक व्यक्ती यांच्यासह उमेदवार नामनिर्देशनपत्रांच्या छाननीसाठी उपस्थित राहू शकेल. निवडणूक निर्णय अधिकारी अशा व्यक्तींना नामनिर्देशनपत्रांची तपासणी करण्यासाठी योग्य त्या सर्व सुविधा देईल.

(९) नामनिर्देशनपत्रांची छाननी करण्यासाठी निश्चित केलेल्या दिवशी निवडणूक निर्णय अधिकारी नामनिर्देशनपत्रांची तपासणी करील आणि कोणत्याही हरकती असल्यास त्यावर निर्णय देईल आणि एकतर अशा हरकतीनुसार किंवा त्यांच्या स्व्त:च्या निर्णयानुसार त्याला आवश्यक वाटेल अशी संक्षिप्त चौकशी केल्यानंतर पुढीलपैकी कोणत्याही कारणांवरून कोणतेही नामनिर्देशनपत्र फेटाळू शकेल.

(क) उमेदवार निवडून येण्यास अर्ह नसेल किंवा या अधिनियमान्वये त्याला अनर्ह ठरविले असेल;

(ख) उमेदवाराला नामनिर्देशित करण्यासाठी प्रस्तावक किंवा अनुमोदक योग्य रीतीने अर्ह नसेल;

(ग) या अधिनियमाच्या किंवा त्याखाली करण्यात आलेल्या नियमांच्या कोणत्याही तरतुदींचे अथवा राज्य निवडणूक आयोगाच्या कोणत्याही आदेशांचे पालन करण्यात कसूर करण्यात आली असेल;

(घ) यथास्थिती उमेदवाराची किंवा प्रस्तावक अथवा अनुमोदक यांची ओळख नामनिर्देशनपत्रामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या त्यांच्या निवडणूक क्रमांकाबरोबर जुळत नसेल.

(ङ) यथास्थिती, उमेदवाराची किंवा प्रस्तावक अथवा अनुमोदक यांची नामनिर्देशनपत्रावरील स्वाक्षरी खरी नसेल किंवा ती लबाडीने मिळविलेली असेल;

(च) उमेदवाराने एकापेक्षा अधिक नामनिर्देशनपत्रे दाखल केली असतील तर, खंड (ग)(घ) किंवा (ङ) मधील कोणतीही बाब, त्याच्या अन्य नामनिर्देशनपत्रांस लागू होणार नाही आणि त्याचे एक नामनिर्देशनपत्र हे या नियमान्वये फेटाळण्यात आलेले आहे केवळ याच कारणामुळे त्याचे नामनिर्देशनपत्र नाकारण्यात येणार नाही.

(१०) निवडणूक निर्णय अधिकारी, भरीव स्वरुपाचा नसेल अशा कोणत्याही दोषासाठी कोणतेही नामनिर्देशनपत्र फेटाळणार नाही.

(११) नामनिर्देशनपत्रांची छाननीही या संदर्भात निश्चित करण्यात आलेल्या दिनांकी करण्यात येईल आणि नैसर्गिक आपत्ती, दंगल किंवा निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या नियंत्रणाबाहेरील अशी अन्य परिस्थिती यामुळे कार्यवाहीमध्ये अडथळा येईल त्याव्यतिरिक्त एरव्ही ती स्थगित करण्यात येणार नाही.

परंतु, असे की, नामनिर्देशनपत्र दाखल करण्याबाबत निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडून किंवा एखाद्या अन्य व्यक्तीकडून कोणतीही हरकत घेण्यात आली असेल त्या बाबतीत, संबंधित उमेदवारास तिचे खंडन करण्यासाठी पुढील कामाच्या दिवसापर्यंतचा अवधी दिला जाईल आणि निवडणूक निर्णय अधिकारी अशा पुढे ढकललेल्या दिवशी आपला निर्णय देईल.

(१२) निवडणूक निर्णय अधिकारी, प्रत्येक नामनिर्देशनपत्रावर नामनिर्देशनपत्रांच्या छाननीच्या परिणामाची नोंद करील आणि जर नामनिर्देशनपत्र फेटाळण्यात आले असेल तर अशा फेटाळणाऱ्या कारणांची देखील नोंद करील.

(१३) नामनिर्देशनपत्रांची छाननी झाल्यानंतर लगेच निवडणूक निर्णय अधिकारी वैध नामनिर्देशित उमेदवारांची एक सूची तयार करील आणि ती सूची त्यांच्या नोटीस बोर्डावर लावील आणि ती अशा प्रकारे जेव्हा लावण्यात आली असेल त्या दिनांकाची व वेळेची दखल नोंद करील.

टीका

**टीका**

छाननीच्यावेळी स्वत: उमेदवार, त्याचा एक सूचक आणि उमेदवाराचा अधिकृत प्रतिनिधी एवढेच लोक उपस्थित राहू शकतात.  यापैकी कुणालाही सर्व उमेदवारांचे अर्ज प्रत्यक्ष पाहता येतात.  त्यावर आक्षेप नोंदविता येतात.  त्याचा निर्णय निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना द्यावयाचा असतो.  आक्षेप घेणाऱ्याला आक्षेपाच्या पुष्टीसाठी योग्य ते पुरावे सादर करावे लागतात.  तांत्रिक त्रुटी तिथल्या तिथे दूर करता येतात.  यावेळीही, कागदपत्रे सादर करण्यासाठी एखाद्या उमेदवारस दुसऱ्या दिवशी पर्यंतची मुदत निवडणूक निर्णय अधिकारी देऊ शकतो.  उमेदवारी अर्जाबरोबर जातीच्या प्रमाणपत्राची मूळ प्रत नसेल तर ती छाननीच्यावेळी दाखविता येते.  तिच्या मागणीची पूर्व कल्पना दिलेली असताना जर छाननीत जातीचा मूळ दाखला हजर केला नाही, तर असा उमेदवारी अर्ज फेटाळणे योग्य ठरते.  **(ऑल इंडिया रिपोर्टर १९८४- सुप्रीम कार्ट-१५१३)**, छाननीत अर्ज वैध ठरल्यानंतर अर्जदार अधिकृत उमेदवार ठरतो.  अशी, उमेदवारांची अधिकृत यादी जाहीर झाल्यानंतरच उमेदवारावर निवडणूकविषयक सर्व बंधने लागूल होतात, तोपर्यंत तो, कायद्याच्या भाषेत उमेदवार असत नाही.

नियम ९ व ९(२)(अ) नुसार ज्या व्यक्तीस ज्या प्रभागातून सदस्य पदाच्या निवडणुकीला उभे राहायचे असेल त्या व्यक्तीच्या नामनिर्देशनपत्रावर फक्त त्या प्रभागातील मतदारांची सूचक व अनुमोदक म्हणून सही पाहिजे. **(अशोक भंडारे वि. कोल्हापूर महानगरपालिका, १९८५ महाराष्ट्र लॉ जनरल-६१३)**

नामनिर्देशनपत्रावर उमेदवाराची संमतीदर्शक सही असणे आवश्यक आहे. जर नामनिर्देशनपत्रावर उमेदवाराची संमतीदर्शक सही नसेल तर त्याने कायदेशीर बाबींची पूर्तता केलेली आहे असे ग्राहय धरता येणार नाही. त्यामुळे उमेदवाराचे नामनिर्देशनपत्र फेटाळले जाईल. **(सुलेमान फक्रुद्दीन वि. एस. बी. कुलकर्णी, ऑल इंडिया रिपोर्टर, बॉम्बे-१८३ : १९६३ महाराष्ट्र लॉ जरनल-३५१ : ६५ बॉम्बे लॉ रिपोर्टर- १२३)**

**[८] [९-अ. उमेदवारी मागे घेण्यासंबंधीच्या तरतुदी.-**

(१) नियम ९ अन्व्ये वैध नामनिर्देशित उमेदवारांची सूची प्रकाशित केल्यानंतर, अशा कोणत्याही उमेदवाराला आपला लेखी अर्ज करून व स्वाक्षरी करून आणि ती, उमेदवारी मागे घेण्याच्या अंतिम दिनांकाच्या दु. ३.०० वाजण्यापूर्वी तो निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे सुपूर्द करून आपली उमेदवारी मागे घेता येईल. याबाबतची नोटीस स्वत: उमेदवारांकडून किंवा त्याच्या प्रस्तावकाकडून किंवा अनुमोदकाकडून किंवा इतर कोणत्याही प्राधिकृत व्यक्तीकडून देता येईल.

(२) पोट-नियम (१) अन्वये नोटीस मिळाल्यावर निवडणूक निर्णय अधिकारी, तिच्या खरेपणाची आणि ती सुपूर्द करणाऱ्या व्यक्तीच्या ओळखीची पडताळणी करील आणि त्यानंतर तिची प्रत आपल्या नोटीस बोर्डावर लावण्याची व्यवस्था करील.]

**१०. उमेदवारांनी अनामत रक्कम ठेवणे.-**

[८][(१) एखाद्या प्रभाग निवडणुकीसाठी उमेदवाराच्या नामनिर्देशनासाठी नियत केलेल्या दिनांकाला किंवा त्यापूर्वी उमेदवाराने रुपये ३,०००/- एवढी रोख रक्कम निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे ठेव म्हणून जमा केली पाहिजे किंवा करण्याची व्यवस्था केली पाहिजे. उमेदवाराने अशी ठेव न भरल्यास तो योग्य रितीने नामनिर्देशित झाला असल्याचे मानण्यात येणार नाही.

परंतु, जेव्हा यथास्थिती, अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमाती किंवा नागरिकांचा मागासवर्ग किंवा महिला यामधील उमेदवारांसाठी जागा राखीव असेल अशा बाबतीत, उमेदवाराने अशा प्रकारे ठेवावयाची रक्कम वर दर्शविलेल्या रकमेच्या ५० टक्के इतकी असेल.

परंतु, आणखी असे की, जेव्हा उमेदवाराने एकाच जागेसाठी एकापेक्षा अधिक नामनिर्देशनपत्रे दाखल केली असल्यास, या नियमानुसार एकापेक्षा अधिक वेळा ठेव रक्कम जमा करण्याची आवश्यकता नाही. ]

(२)(अ) उमेदवार रीतसर निवडून आला आहे असे जाहीर करण्यात आले किंवा तसे मानले गेले.

(ब) उमेदवारांच्या नामनिर्देशनासाठी नेमलेल्या दिवसानंतर [६] [तीन] दिवसांच्या आत निवडणूक न लढविण्याचा आपला उद्देश आहे असे उमेदवाराने [६][राज्य निवडणूक आयुक्तास किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास] लेखी कळवले,

(क) उमेदवारांचे नामनिर्देशन बेकायदेशीर ठरविण्यात आले,

(ड) नामनिर्देशन पत्रांच्या छाननीनंतर आणि मतदान सुरु होण्यापूर्वी उमेदवार मरण पावला, किंवा

(ई) उमेदवार निवडून आला नसेल परंतु त्याने पोट-नियम (४) मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेल्या संख्येपेक्षा अधिक कायदेशीर मते मिळविली असतील,

तर अनामत रक्कम परत करण्यात आली पाहिजे.

(३) अनामत रक्कम ज्या व्यक्तीने ठेवली होती त्या व्यक्तीस ती परत करण्यात आली पाहिजे. मतदानासाठी ठरवलेल्या तारखेपूर्वी उमेदवार मरण पावल्यास, त्याने अनामत रक्कम ठेवली असेल, तर ती त्याच्या कायदेशीर प्रतिनिधीस परत केली पाहिजे आणि ती अनामत रक्कम त्या उमेदवारोन ठेवली नसेल, तर ज्या व्यक्तीने ती ठेवली होती त्या व्यक्तीस ती परत केली पाहिजे.

(४) उमेदवार निवडून आला नाही आणि त्यास मिळालेल्या कायदेशीर मतांची संख्या ही, ज्या प्रभागासाठी उमेदवार नामनिर्देशित केला असेल त्या प्रभागात निवडून द्यावयाच्या पालिका सदस्यांच्या संख्येने मतदान झालेलया एकूण कायदेशीर मतांच्या संख्येस भागले असता येणाऱ्या संख्येच्या एक-अष्टमांशापेक्षा अधिक नसेल, तर त्याची अनामत रक्कम जप्त होऊन महानगरपालिकेकडे जमा केली जाईल.

(५) अनामत रक्कम जप्त झाली नाही तर, ती नियम ३९ अन्वये निवडणुकीचा निकाल जाहीर करण्यात आल्यावर शक्य तितक्या लवकर परत करण्यात आली पाहिजे.

परंतु, एखादा उमेदवार सार्वत्रिक निवडणुकीसाठी एकापेक्षा अधिक प्रभागांसाठी रीतसर नामनिर्देशित केलेला असेल, तर त्याने किंवा त्याच्या वतीने ठेवलेल्या अनामत रकमांपैकी फक्त एक अनामत रक्कम परत करण्यात येईल आणि बाकीच्या अनामत रकमा, जप्त होऊन महानगरपालिकेकडे जमा केल्या जातील.

[८][११. प्रभाग निवडणुका पार पाडण्यात येतात तेव्हा मतदान घेणे आणि वैध रितीने नामनिर्देशित उमेदवारांची नावे प्रसिध्द करणे.-**

(१) राज्य निवडणूक आयोगाने जारी केलेल्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष निदेशांच्या अधीन राहून निवडणूक निर्णय अधिकारी, उमेदवारी मागे घेण्याच्या शेवटच्या दिनांकानंतर ताबडतोब दुसऱ्या दिवशी निवडणूक लढविणाऱ्या प्रत्येक उमेदवाराला निवडणूक चिन्ह राज्य निवडणूक आयोगाने विनिर्दिष्ट केलेल्या रितीने नेमून देईल व सोपवील.

(२) पूर्ववर्ती पोट-नियमानुसार कोणतेही निवडणूक चिन्ह सोपविताना निवडणूक निर्णय अधिकाऱ्याचा निर्णय अंतिम असेल.

(३) निवडणूक चिन्ह नेमून दिल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी, नामनिर्देशनपत्रामध्ये नमूद असल्याप्रमाणे त्यांचे नाव व पत्ता त्यानुसार निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या आडनावाव्या (आडनाव असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत) वर्णक्रमानुसार एक सूची प्रसिध्द करेल.

(४) निवडणूक चिन्ह नेमून दिल्यानंतर, निवडणूक चिन्ह नेमून देण्यासाठी नियत करण्यात आलेल्या दिनांकानंतर दहा दिवसांपेक्षा अधीचा नसेल त्या दिनाकांला आवश्यक असेल तर मतदान घेण्यात येईल.]

**१२. प्रभागाच्या लढविण्यात येणाऱ्या निवडणुकांसंबंधी तरतुदी.-**

प्रभागाच्या लढविण्यात येणाऱ्या निवडणुकांच्या बाबतीत पुढील तरतुदी लागू होती;

(अ) मते गुप्त मतदान पध्दतीने व जातीने देण्यात आली पाहिजेत. बदली व्यक्तींमार्फत कोणतीही मते स्वीकारण्यात येता कामा नयेत.

(ब) ६[राज्य निवडणूक आयुक्ताने किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने] ज्या कोणत्याही उमेदवाराचे नाव नियम ११, पोटनियम (२) अन्वये कायदेशीररित्या नामनिर्देशित म्हणून प्रसिध्द केले नसेल अशा उमेदवारासाठी कोणतीही मते स्वीकारण्यात येता कामा नयेत.

(क) ज्या प्रभागासाठी निवडणूक घेण्यात येत आहे त्या प्रभागाचा मतदार म्हणून त्या प्रभागाच्या मतदारांच्या यादीत ज्या व्यक्तीचे नाव दाखल करण्यात आले नसेल अशा कोणत्याही व्यक्तीकडून कोणतीही मते स्वीकारण्यात येता कामा नयेत.

[२][***]

८[(ई) प्रत्येक मतदाराला त्यांच्या प्रभागामध्ये जागा असतील त्याप्रमाणे त्या संख्येत मत देण्याचा हक्क असेल;]

(ग) कोणत्याही उमेदवारांमध्ये समसमान मते पडल्याचे आढळून येईल आणि एका मताची भर घातली असता त्या उमेदवारापैकी कोणत्याही एका उमेदवारास निवडून आल्याचे जाहीर केले जाण्याचा हक्क प्राप्त होत असेल तर, ज्या व्यक्तीला किंवा व्यक्तींना असे जादा मत देण्यात आले आहे असे मानले जाईल ती व्यक्ती किंवा त्या व्यक्ती आयुक्ताच्या समक्ष, तो ठरवील अशा रीतीने, चिठ्ठया टाकून ठरवण्यात आले पाहिजेत;

(ह) एखादा उमेदवार एकापेक्षा अधिक जागांसाठी पालिका सदस्य म्हणून निवडून आला असेल तर, त्याने त्याबाबत ६[राज्य निवडणूक आयुक्ताकडून किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याकडून] लेखी नोटीस मिळाल्यानंतर तीन दिवसांच्या आत आपली पसंती स्वत:च्या सहीने ६[राज्य निवडणूक आयुक्तास किंवा त्याने प्राधिकत कलेल्या अधिकाऱ्यास] लेखी कळवली पाहिजे, किंवा त्याने तसे करण्यात कसूर केल्यास, ६ [राज्य निवडणूक आयुक्ताने किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने] अशा पसंतीसाठी देण्यात आलेली वेळ संपेल तेव्हा, तो उमेदवार अशा जागांपैकी कोणत्या जागेसाठी काम करीत ते घोषित केले पाहिजे आणि अशा रीतीने केलेली पसंती किंवा घोषणा निर्णायक असेल.

(आय) अशी कोणतीही पसंती किंवा घोषणा करण्यात येईल, तेव्हा पूर्वोक्त उमेदवार ज्या प्रभागासाठी काम करणार नसेल अशा कोणत्याही प्रभागात त्याच्यासाठी नोंदलेली मते ही, देण्यात आली नाहीत असे मानले जाईल आणि उक्त मतांच्या अभावी जो उमेदवार तसा उमेदवार असल्यास, अशा प्रभागासाठी निवडून आल्याचे जाहीर करण्यात आले असेल तो उमेदवार त्या प्रभागासाठी निवडून आला आहे असे मानले जाईल.

(ज) ६[राज्य निवडणूक आयुक्ताने किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने] शक्य तितक्या लवकर मतदानाचा निकाल जाहीर केला पाहिजे व त्यात प्रत्येक उमेदवारास देण्यात आलेल्या कायदेशीर मतांची एकूण संख्या विनिर्दिष्ट केली पाहिजे; तसेच, त्याने प्रत्येक प्रभागासाठी याद्या तयार करून त्यात सर्व उमेदवारांची नावे व प्रत्येक उमेदवारास देण्यात आलेल्या कायदेशीर मतांची एकूण संख्या विनिर्दिष्ट करण्याची व्यवस्था केली पाहिजे; ६ [राज्य निवडणूक आयुक्त किंवा त्याने प्राधिकृत केलेला अधिकारी] या प्रयोजनासाठी तयार करील अशा नियमास अनुसरुन आणि तो विहित करील अशी फी देण्यात आल्यावर अशा यादीची एक प्रत प्रभागाच्या कोणत्याही उमेदवारास पुरविण्यात आली पाहिजे आणि ती यादी प्रभागातील कोणत्याही मतदारास पाहण्यासाठी उपलब्ध करून दिली पाहिजे.

## प्रभागांच्या निवडणुकांतील मतदार

**१३. मतदानास सुरुवात होण्याची व ते बंद होण्याची वेळ.-**

मतदारासाठी नियम ११ अन्वये ठरवलेल्या तारखेस ज्यावेळी मतदानास सुरुवात होईल व ज्यावेळी मतदान बंद होईल त्या वेळा आयुक्ताने ठरवल्या पाहिजेत.

**१४. मतदान केंद्रे आणि मतदान केंद्राध्यक्ष.-**

(१) ६[राज्य निवडणूक आयुक्ताने किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने] प्रत्येक प्रभागासाठी त्यास आवश्यक वाटतील इतकी मतदान केंद्रे निवडली पाहिजेत आणि अशा रीतीने निवडलेली मतदान केंद्रे व ज्या मतदान क्षेत्रांसाठी ती अनुक्रमे निवडण्यात आली असतील ती मतदान क्षेत्रे दर्शविणारी एक यादी त्यास पुरेशी वाटेल अशा रीतीने प्रसिध्द केली पाहिजे.

(२) ६ [राज्य निवडणूक आयुक्ताने किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने] प्रत्येक मतदान केंद्रासासठी एक मतदान केंद्राध्यक्षाची नेमणूक केली पाहिजे आणि मतदान केंद्राध्यक्षास साहय करण्यासाठी त्यास आवश्यक वाटतील अशा अन्य व्यक्तींची, ज्यांचा यात यापुढे मतदान अधिकारी असा उल्लेख करण्यात आला आहे, नेमणूक केली पाहिजे.

(३) प्रत्येक मतदान अधिकाऱ्यास, मतदान केंद्राध्यक्षाने तसा निदेश दिल्यास, या नियमान्वये मतदान केंद्राध्यक्षाकडे सोपवलेली सर्व किंवा कोणतीही कर्तव्ये पार पाडतायेतील.

(४) मतदान केंद्राध्यक्षास आजारीपणामुळे किंवा अन्य अपरिहार्य कारणामुळे मतदान केंद्रावर उपस्थित राहता आले नाही, तर त्याची कर्तव्ये, ६ [राज्य निवडणूक आयुक्त किंवा त्याने प्राधिकृत केलेला अधिकारी] याबाबत मतदान अधिकाऱ्यांपैकी ज्या मतदान अधिकाऱ्यास रीतसर प्राधिकृत करील त्या मतदान अधिकाऱ्याने पार पाडली पाहिजेत.

**१५. मतदान केंद्राध्यक्षाची कर्तव्ये.-**

(१) मतदान केंद्राध्यक्षाने मतदान कंद्रावर सुव्यवस्था राखली पाहिजे, निवडणूक आयोग योग्य प्रकारे घेण्यात येत आहे याकडे लक्ष दिले पाहिजे, एका वेळी आत जाऊ द्यावयाच्या मतदारांच्या संख्येचे नियम केले पाहिजे, आणि तसेच त्याने-

(अ) मतदान अधिकारी, उमेदवार आणि उमेदवाराने लेखी नेमलेला व आयुक्तयाने याबाबत प्राधिकृत केलेला प्रत्येक उमेदवाराचा एक प्रतिनिधी (ज्याचा यात यापुढे मतदान प्रतिनिधी असा उल्लेख करण्यात आला आहे);

(ब) मतदान अधिकारी किंवा कामावर असलेले अन्य लोकसेवक; आणि

(क) मतदारांना ओळखण्याच्या प्रयोजनासाठी मतदान केंद्राध्यक्ष वेळोवेळी प्रवेश देईल अशा अन्य व्यक्ती;

यांच्या व्यतिरिक्त अन्य सर्व व्यक्तींना बाहेर काढले पाहिजे.

[४][(२) मतदान केंद्राध्यक्षाने नियम १३ अन्वये त्या बाबतीत निश्चित केलेल्या वेळी मतदान केंद्र बंद केले पाहिजे आणि त्यानंतर, त्याने कोणत्याही मतदारास मतदान केंद्रात प्रवेश करू देता कामा नये.

परंतु, मतदान केंद्र बंद होण्यापूर्वी तेथे हजर असलेल्या सर्व मतदारांना मतदान करण्याची परवानगी देण्यात आली पाहिजे.

(३) मतदान केंद्र बंद होण्यापूर्वी एखादा मतदार तेथे हजर होता किंवा कसे यासंबंधी कोणताही प्रश्न उद्भवल्यास, मतदान केंद्राध्यक्षाने त्या प्रश्नाचा निर्णय केला पाहिजे व त्याचा निर्णय अंतिम असेल.]

**१६. गैरवर्तणुकीबद्दल मतदान केंद्रातून बाहेर काढणे.-**

कोणतीही व्यक्ती स्वत: मतदान केंद्रावर गैरवर्तणूक करील किंवा मतदान केंद्राध्यक्षांच्या किंवा मतदान केंद्राध्यक्षाची कर्तव्ये पार पाडणाऱ्या मतदान अधिकाऱ्याच्या कायदेशीर आदेशांचे पालन करण्यात कसूर करील, तर त्या व्यक्तीस, मतदान केंद्राध्यक्षाच्या किंवा अशा मतदान अधिकाऱ्याच्या आदेशावरून कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याकडून, किंवा मतदान केंद्राध्यक्षाने किंवा अशा मतदान अधिकाऱ्याने त्या व्यक्तीस बाहेर काढण्यासाठी लेखी प्राधिकृत केलेल्या अन्य कोणत्याही व्यक्तीकडून मतदान केंद्रातून ताबडतोब बाहेर काढता येईल; आणि अशा रीतीने बाहेर काढलेल्या व्यक्तीस मतदान केंद्राध्यक्षांच्या किंवा अशा मतदान अधिकाऱ्याच्या परवानगीशिवाय, त्या दिवशी मतदान केंद्रात पुन्हा प्रवेश करू देता कामा नये;

परंतु, कोणत्याही मतदान केंद्रात मत देण्याचा अन्यथा हक्क असलेल्या कोणत्याही मतदारास अशा मतदान केंद्रात मत देण्याची संधी मिळण्यास प्रतिबंध होईल अशा रीतीने या अधिकाराचा वापर करता कामा नये.

[४][***]

**१८. मतदान कक्ष.-**

प्रत्येक मतदान केंद्रात मतदारांना आपली मते लोकांना दिसणार नाहीत अशा रीतीने नोंदता यावीत म्हणून [६] [राज्य निवडणूक आयुक्तास किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास ] आवश्यक वाटतील इतक्या मतदान कक्षांची तरतूद केली पाहिजे.

## १९. निवडणुकीची सामग्री व मतपेटया पुरवणे.-

[राज्य निवडणूक आयुक्ताने किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने] प्रत्येक मतदान केंद्रात, मतदारांना मतपत्रिकांवर खुणा करता याव्यात म्हणून पुरेशी सामग्री, आवश्यक असतील तितक्या मतपेटया, आणि अशा मतदारांच्या यादीत किंवा अशा यादीच्या अशा भागाच्या प्रती यांची तरतूद केली पाहिजे.

## २०. मतपेटयांना मोहोर लावणे.-

प्रत्येक मतपेटीची रचना अशी करण्यात आली पाहिजे की, तीत मतपत्रिका टाकता येतील, परंतु तिचे कुलूप काढल्याशिवाय त्यामधून मतपत्रिका काढता येणार नाहीत. मतदान सुरु होण्याच्या निकटपूर्वी, कोणत्याही मतदान केंद्रावरील मतदान केंद्राध्यक्षाने अशा मतदान केंद्रात उपस्थित असलेल्या व्यक्तींना रिकामी मतपेटी दाखविली पाहिजे म्हणजे ती रिकामी असल्याविषयी त्यांची खात्री होईल, आणि त्यानंतर त्याने तिला कुलूप लावून तिच्यावर अशा रीतीने आपली मोहोर लावली पाहिजे की, अशी मोहोर तोडल्याशिवाय ती मतपेटी उघडता येणार नाही. त्यानंतर त्याने ती मतपेटी मतपत्रिका टाकण्यासाठी, त्यास दिसेल अशा जागी आणि अशा रीतीने कुलूप लावून मोहोरबंद केलेल्या स्थितीत ठेवली पाहिजे.

## २१. मतदारास मतपत्रिका देण्यापूर्वीची कार्यपध्दती.-

मतदारास, मतपत्रिका देण्याच्या निकटपूर्वी, मतदारांच्या यादीत नमूद केल्याप्रमाणे त्या मतदाराचा क्रमांक, नाव व वर्णन पुकारण्यात आले पाहिजे, आणि मतदाराचा क्रमांक स्थळप्रतीत दाखल केला पाहिजे व मतदारांच्या यादीत प्रतीत मतदारांच्या क्रमांकासमोर, त्यास मतपत्रिका मिळाली आहे असे दर्शविण्यासाठी परंतु त्यास जी मतपत्रिका मिळाली असेल तिचा तपशील न दाखवता, खूण केली पाहिजे. स्थळप्रतीत प्रभागाचे नाव, मतदान केंद्राचे नाव किंवा त्याचा व्यवच्छेदक क्रमांक आणि मतदाराची सही किंवा त्याच्या अंगठयाचा ठसा दाखल केला पाहिजे.

## २२. मतदान.-

मतदाराने मतपत्रिका मिळाल्यावर ताबडतोब मतदान केंद्रातील कक्षांपैकी एका कक्षात गेले पाहिजे. ४ [आणि त्याने त्या कारणासाठी पुरविण्यात आलेल्या साधनाने, मतपत्रिकेवर एकतर फुलीचे चिन्ह करण्यासाठी तरतूद केलेल्या जागेवर किंवा त्याला ज्या उमेदवारास मत द्यावयाचे असेल त्या

उमेदवाराच्या नावावर व चिन्हावर किंवा त्याच्याजवळ खूण केली पाहिजे] आणि आपले मत दिसणार नाही अशा रीतीने मतपत्रिकेची घडी केली पाहिजे आणि अशा रीतीने घडी केलेली आपली मतपत्रिका मतपेटीत टाकली पाहिजे. प्रत्येक मतदाराने गैरवाजवी विलंब न लावता मतदान केले पाहिजे आणि त्याने आपली मतपत्रिका मतपेटीत टाकल्यावर लवकरात लवकर मतदान केंद्रातून बाहेर गेले पाहिजे.

**२३. मतदारांना साह्य.-**

मतदान केंद्राध्यक्षाने, जो कोणताही मतदार अपंगत्वामुळे किंवा निरक्षरतेमुळे विहित केलेल्या रीतीने मतदान करण्यास असमर्थ असेल अशा मतदारास आवश्यक ते साह्य दिले पाहिजे.

**२४. मतदारांची ओळख.-**

मतदारास मतपत्रिका देण्यापूर्वी कोणत्याही वेळी, मतदान केंद्राध्यक्षास किंवा मतदान अधिकाऱ्यास मतदाराच्या ओळखीविषयी किंवा अशा मतदान केंद्रात मतदान करण्याच्या त्याच्या हक्काविषयी शंका घेण्यास संयुक्तिक कारण असेल, तर त्यास स्वत:हून मतदारास पुढील प्रश्न विचारता येतील आणि उमेदवाराने किंवा मतदान अभिकर्त्याने तसे करण्यास सांगितल्यास त्याने पुढील प्रश्न विचारले पाहिजेत.

(१)यादीत नाव दाखल केलेली व्यक्ती तुम्हीच आहात काय? (यादीतील संपूर्ण नोंद वाचून दाखववावी) आणि

(२)या प्रभागातील चालू निवडणुकीत तुम्ही यापूर्वीच मतदान केले आहे काय? आणि सार्वत्रिक निवडणुकीच्यावेळी -

(३)या निवडणुकीत अन्य कोणत्याही प्रभागात तुम्ही यापूर्वीच मतदान केले आहे काय? पहिल्या प्रश्नाचे होकारार्थी उत्तर दिले नसेल, तर व दुसऱ्या प्रश्नाचे नकारार्थी उत्तर दिले नसेल, तर त्यास मतपत्रिका देता कामा नये.

**२५. मतपत्रिकेचा नमुना.-**

(१) मतपत्रिका नमुना "ब" मध्ये असली पाहिजे.

(२) मतपत्रिकांवर अनुक्रमांक असले पाहिजे आणि हे अनुक्रमांक स्थळप्रतीवर आणि मतपत्रिकेच्या मागील बाजूवर छापलेले असले पाहिजेत.

**२६. प्रदत्त मते. -**

एखादी व्यक्ती मतदारांच्या यादीत नाव असलेला विशिष्ट मतदार मीच आहे असे सांगेल आणि असा मतदार म्हणून दुसऱ्या व्यक्तीने मतदान केलेले असतानाही मतपत्रिका मिळण्यासाठी विनंती करील तर अशी विनंती करणाऱ्या व्यक्तीस, तिने मतदान केंद्राध्यक्ष विचारील अशा प्रश्नांची योग्य उत्तरे दिल्यानंतर मतपत्रिकेवर अन्य कोणत्याही मतदाराप्रमाणेच खूण करण्याचा हक्क असेल. अशी मतपत्रिका (जिचा यात यापुढे 'प्रदत्त मतपत्रिका' असा उल्लेख करण्यात आला आहे) मतपेटीत टाकण्याऐवजी मतदान केंद्राध्यक्षाकडे दिली पाहिजे आणि त्याने त्यावर मतदाराचे नाव, मतदारांच्या यादीतील त्याचा क्रमांक आणि ती मतदारांची यादी ज्या प्रभागाशी संबंधित असेल त्या प्रभागाचे नाव पृष्ठांकित केले पाहिजे. अशी मतपत्रिका एका स्वतंत्र पाकिटात घालून बाजूला ठेवली पाहिजे व [६][राज्य निवडणूक आयुक्ताने किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने] ती मोजता कामा नये. मतदाराचे नाव, मतदारांच्या यादीतील त्याचा क्रमांक आणि ती मतदारांची यादी ज्या मतदान केंद्राशी संबंधित असेल त्या मतदान केंद्राचे नाव किंवा व्यवच्छेदक क्रमांक नमुना 'क' मधील यादीत लिहिला पाहिजे आणि अशा यादीवर 'प्रदत्त मतांची यादी' असे शीर्षक लिहिले पाहिजे. अशी मतपत्रिका देणाऱ्या व्यक्तीने त्यावर आपले नाव व पत्ता लिहून सही केली पाहिजे आणि अशा व्यक्तीस लिहिता येत नसेल, तर तिने त्या यादीतील नोंदीपुढे आपल्या अंगठ्याचा ठसा उमटवला पाहिजे.

**२७. आक्षेपित मते.-**

कोणत्याही व्यक्तीने मतपत्रिका मिळण्यासाठी विनंती करुन तोतयेगिरीचा अपराध केला आहे असे कोणत्याही मतदान अभिकर्त्याने जाहीर केले व तसे सिध्द करण्याची जबाबदारी पत्करली, तर मतदान केंद्राध्यक्ष अशा व्यक्तीस आक्षेपित मतांच्या यादीत (ही यादी नमुना 'ड' मध्ये ठेवण्यात आली पाहिजे) तिचे नाव व पत्ता लिहिण्यास, किंवा तिला लिहिता येत नसेल तर त्यावर तिच्या अंगठ्याचा ठसा उमटविण्यास सांगू शकेल आणि तसेच, त्यास अशा व्यक्तीस स्वत:च्या ओळखीविषयी पुरावा सादर करण्यास सांगू शकेल. नियम २४ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे प्रश्न विचारण्यात आल्यावर अशा व्यक्तीने पहिल्या प्रश्नाचे उत्तर होकारार्थी दिले आणि अन्य प्रश्नांचे उत्तर नकारार्थी दिले तर, तिला तोतयेगिरीबद्दल होणाऱ्या शास्तीसंबंधी माहिती देण्यात आल्यावर तिला मतदान करण्याची परवानगी देण्यात येईल. मतदान केंद्राध्यक्षाने आक्षेपित मतांच्या यादीत त्या परिस्थितीसंबंधी व स्वत:च्या निर्णयासंबंधी नोंद केली पाहिजे :

**२८. खराब झालेल्या मतपत्रिका.-**

एखाद्या मतदाराने आपली मतपत्रिका तिचा मतपत्रिका म्हणून सोयीस्करपणे उपयोग करता येणार नाही अशा रीतीने अनवधानाने हाताळली तर, त्याने ती मतपत्रिका मतदान केंद्राध्यक्षाच्या स्वाधीन केल्यावर व अनवधानाबद्दल त्याची खात्री करुन दिल्यावर त्यास खराब झालेल्या मतपत्रिकेवर व तिच्या स्थळप्रतीवर ती रद्द केल्याची खूप केली पाहिजे.

**२९. मतदान केंद्रात कामावर असलेल्या अधिकाऱ्यांनी मतदान करणे.-**

(१) मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी [४][किंवा मतदान प्रतिनिधी किंवा इतर लोकसेवक हा,

त्यास ज्या मतदान केंद्रात मत देण्याचा हक्क नाही अशा मतदान केंद्रात किंवा मतदान केंद्राजवळ निवडणूकविषयक कामावर असेल तर ज्या प्रभागाच्या संबंधात त्यास कामावर नेमण्यात आले असेल त्या प्रभागाच्या किंवा अन्य कोणत्याही प्रभागाच्या निवडणुकीत मत देण्याचा त्यास हक्क आहे असे प्रमाणपत्र [६][राज्य निवडणूक आयुक्ताने किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने] त्यास दिले असल्यास, त्यास त्या मतदान केंद्रात आपले मत देण्याची परवानगी देण्यात येईल. त्यास अन्यथा ज्या मतदान केंद्रात मतदान करण्याचा हक्क प्राप्त झाला असता त्या मतदान केंद्राचे नाव व ज्या प्रभागात ते मतदान केंद्र असेल त्या प्रभागाच्या मतदारांच्या यादीतील त्याचा क्रमांक मतपत्रिकेच्या स्थळ प्रतीत दाखल केला पाहिजे. या नियमान्वये दिलेले प्रमाणपत्र नमुना 'ई' मध्ये असले पाहिजे.

(२) मतदान केंद्राध्यक्षाने अशी मतपत्रिका एका पाकिटात घालून ते पाकीट मोहोरबंद केले पाहिजे आणि पोट-नियम (१) मध्ये उल्लेख केलेल्या प्रमाणपत्रासह ते [६][राज्य निवडणूक आयुक्ताकडे किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याकडे] पाठविले पाहिजे, आणि [६][राज्य निवडणूक आयुक्ताने किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने] अशी मतपत्रिका समुचित प्रभागाच्या कायदेशीर मतपत्रिकांमध्ये समाविष्ट करण्याची, व्यवस्था केली पाहिजे.

**३०. मतपत्रिका पाठविणे.-**

प्रत्येक मतदान केंद्राच्या मतदान केंद्राध्यक्षाने मतदान बंद झाल्यावर शक्य तितक्या लवकर, जे कोणतेही उमेदवार किंवा मतदान प्रतिनिधी उपस्थित असतील त्यांच्या समक्ष पुढील गोष्टींची वेगवेगळी पुडकी करुन ती स्वत:ची मोहोर लावून आणि ज्या उमेदवारांची किंवा प्रतिनिधींची स्वत:ची मोहोर लावण्याची इच्छा असेल त्या उमेदवारांच्या किंवा प्रतिनिधींच्या मोहरा लावून मोहोरबंदी केली पाहिजे:

(१) प्रत्येक मतदान केंद्रात उपयोगात आणलेली, बंद असलेली परंतु बरोबर किल्ली असलेली प्रत्येक मतपेटी;

(२) न वापरलेल्या मतपत्रिका;

(३) प्रदत्त मतपत्रिका;

(४) खराब झालेल्या मतपत्रिका;

(५) मतदारांच्या यादीची खुणा केलेली प्रत;

(६) मतपत्रिकांची स्थळप्रत;

(७) प्रदत्त मतांची यादी ; आणि

(८) आक्षेपित मतांची यादी

आणि अशा प्रत्येक पाकिटावर त्यामधील वस्तूंचे वर्णन लिहून अशी पाकिटे [६][राज्य निवडणूक आयुक्ताच्या किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याच्या] स्वाधीन केली पाहिजेत.

**३१. मतपत्रिकांबरोबर आयुक्ताकडे विवरणपत्र पाठविणे.-**

मतदान केंद्राध्यक्षाने पाकिटांबरोबर नमुना 'फ' मध्ये एक विवरणपत्र पाठविले पाहिजे व त्यात त्याच्याकडे सोपविलेल्या मतपत्रिकांची संख्या दर्शविली पाहिजे आणि मतपेटीतील मतपत्रिका, न वापरलेल्या मतपत्रिका, खराब झालेल्या मतपत्रिका व प्रदत्त मतपत्रिका आणि नियम १९ अन्वये उपयोगात आणलेल्या मतपत्रिका या शीर्षकाखाली त्या मतपत्रिकांचा हिशेब दर्शविला पाहिजे.

**३२. मतदान पुढे ढकलणे; मतदान तहकूब करणे.-**

या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी [६][ राज्य निवडणूक आयुक्तास किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास], मतदानासाठी ठरविलेली तारीख पुढे ढकलता येईल किंवा मतदानासाठी ठरविलेला कालावधी वाढविता येईल व त्याची पुरेशी कारणे लेखी नमूद करावी लागतील. सार्वजनिक शांततेचा भंग होणे यासारख्या आणीबाणीच्या परिस्थितीत, मतदान केंद्राध्यक्षास, [६][राज्य निवडणूक आयुक्ताच्या किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याच्या ] पूर्वमान्यतेने मतदान बंद करता येईल आणि मतदानानंतरच्या दिवसापर्यंत तहकूब करण्यात आल्याचे जाहीर करता येईल.

नंतरच्या ज्या तारखेपर्यंत मतदान पुऐ ढकलण्यात आले असेल किंवा तहकूब करण्यात आले असेल ती तारीख आयुक्तास योग्य वाटेल अशा रीतीने अधिसूचित करण्यात येईल.

## मतांची छाननी व मोजणी करणे आणि निकाल जाहीर करणे

**३३. मतमोजणीसाठी तारीख, वेळ व ठिकाण निश्चित करणे.-**

[६][राज्य निवडणूक आयुक्ताने किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने], मतदान बंद झाल्यावर व्यवहार्य असेल तितक्या लवकर सर्व उमेदवारांना मतमोजणीसाठी त्याने ठरविलेली तारीख, वेळ व ठिकाण यासंबंधी लेखी सूचना दिली पाहिजे.

**३४. मतमोजणीच्या वेळी कोणास उपस्थित राहता येतील.-**

(१) [६][राज्य निवडणूक आयुक्त किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या अधिकारी] आणि मतमोजणीसाठी त्यास साह्य करण्यासाठी तो नेमील अशा व्यक्ती, उमेदवार आणि याबाबत उमेदवाराने लेखी प्राधिकृत केलेला प्रत्येक उमेदवाराचा एक प्रतिनिधी यांच्याव्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीस मतमोजणीच्या वेळी उपस्थित राहण्याची परवानगी देण्यात येता कामा नये.

(२) निवडणुकीशी संबंधित असलेल्या कोणत्याही प्रयोजनांसाठी कोणत्याही उमेदवाराने किंवा त्याच्या वतीने कामावर नेमलेल्या कोणत्याही व्यक्तीस मतमोजणीसाठी साह्य करण्यासाठी नेमण्यात येता कामा नये.

**३५. मतमोजणीच्या वेळी अनुसरावयाची कार्यपध्दती.-**

नियम ३३ अन्वये नेमलेल्या दिवशी व वेळी [६][राज्य निवडणूक आयुक्ताने किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने] पुढीलप्रमाणे कार्यवाही केली पाहिजे.

(अ) प्रत्येक मतदान केंद्राशी संबंधित असलेली मतपेटी किंवा मतपेट्या किंवा यथास्थिती ज्यात मतपत्रिका असतील अशी पाकिटे एकामागून एक उघडली जातील आणि [६][राज्य निवडणूक आयुक्ताने किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने] त्यातून मतपत्रिका बाहेर काढल्या पाहिजेत, त्या मोजल्या पाहिजेत किंवा मोजण्याची व्यवस्था केली पाहिजे आणि त्यांची संख्या विवरणपत्रात नमूद केली पाहिजे; असे विवरणपत्र कोणत्याही उमेदवारास किंवा उमेदवाराच्या कोणत्याही प्रतिनिधीस दाखवता कामा नये.

(ब) त्यानंतर [६][राज्य निवडणूक आयुक्ताने किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने], अशा रीतीने बाहेर काढलेल्या सर्व मतपत्रिका एकत्र केल्या पाहिजेत आणि त्यांचेसोयीस्कर असे गठ्ठे करुन ते मतमोजणीसाठी साह्य करण्यासाठी नेमलेल्या व्यक्तींना वाटून दिले पाहिजेत.

(क) मतपत्रिका अशा रीतीने वाटून देण्यात आल्यानंतर परंतु त्यापूर्वी नव्हे, ६[ राज्य निवडणूक आयुक्ताने किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने] उमेदवारांना व त्यांच्या प्रतिनिधींना मतपत्रिकांना हात न लावता त्यांची पाहणी करण्याची वाजवी संधी दिली पाहिजे आणि पूर्णत: किंवा अंशत: बाद ठरविलेल्या प्रत्येक मतपत्रिकेवर 'बाद' असा शब्द पृष्ठांकित केला पाहिजे. कोणत्याही उमेदवाराने किंवा प्रतिनिधीने बाद ठरवण्याच्या अचूकपणाविषयी हरकत घेतल्यास

६[ राज्य निवडणूक आयुक्ताने किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने] त्या मतपत्रिकेवर बाद ठरवण्याची कारणेदेखील नमूद केली पाहिजेत. कोणत्याही उमेदवारास किंवा त्याच्या प्रतिनिधीस कोणत्याही मतपत्रिकेच्या मागील बाजूवरील अनुक्रमांक पाहण्याची परवानगी देता कामा नये.

(ड) ६[ राज्य निवडणूक आयुक्ताने किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने], व्यवहार्य असेल तितपत मतमोजणीचे काम सतत चालू ठेवले पाहिजे, आणि आवश्यक अशा मधल्या कोणत्याही कालावधीत मतमोजणीचे काम सतत चालू ठेवले पाहिजे, आणि आवश्यक अशा मधल्या कोणत्याही कालावधीत मतमोजणीचे काम स्थगित ठेवावे लागले, तर अशा कालावधीत मतपत्रिका, पुडकी व निवडणुकीशी संबंधित अशी अन्य कागदपत्रे आयुक्ताने स्वत:ची मोहोर लावून व ज्या उमेदवारांची किंवा प्रतिनिधींची मोहोर लावण्याची इच्छा असेल त्या उमेदवारांच्या किंवा प्रतिनिधींच्या मोहरा लावून मोहोरबंद करुन ठेवली पाहिजेत आणि त्यांच्या सुरक्षित अभिरक्षेसाठी योग्य खबरदारी घेण्याची व्यवस्था केली पाहिजे.

(ई) मतमोजणी पूर्ण झाल्यावर ६[ राज्य निवडणूक आयुक्ताने किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने] नियम १२ च्या तरतुदीच्या अधिन राहून निवडणुकीचा निकाल ताबडतोब जाहीर केला पाहीजे.

## राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति
जिल्हाधिकारी (सर्व)
विषय - **मतमोजणी संबंधात सूचना**

बहुसदस्यीय प्रभाग व अध्यक्षपदासाठी थेट निवडणूक प्रणालीप्रमाणे मतदान व मतमोजणी या वर्षी प्रथमच होत आहे. मतमोजणी करताना एका प्रभागातील सर्व पेट्या उघडून झाल्यानंतर त्यामधील

मतपत्रिकांचे रंगवार विभागणी करुन त्यामध्ये प्रभागातील उमेदवारांच्या मतपत्रिका ५०-५० चे गट्ठे करुन एकत्रित मिसळावे व त्यानंतर मतमोजणी सुरु करावी. मतमोजणीसाठी १० ते १२ टेबले लावावीत. जर यापेक्षा अधिक टेबल आवश्यक असल्यास तसा निर्णय जिल्हाधिकाऱ्यांनी घ्यावयाचा आहे. प्रत्येक प्रभागास जरुर तेवढी टेबले नेमून देण्यात यावीत. सुरक्षिततेच्या दृष्टीने उपाययोजना पुरेशी आहे, याची खात्री करावी.

(२) अध्यक्षांच्या मतमोजणीसाठी वेगळा कक्ष स्थापन करावा. त्यामध्ये टेबले किती लावावीत, याचा निर्णय जिल्हाधिकाऱ्यांनी घ्यावयाचा आहे. अध्यक्षांच्या मतमोजणीसाठी प्रभागांच्या मतपत्रिका जसजशा एकत्र होत जातील तसा मतमोजणीस प्रारंभ करावा, म्हणजे कोणत्या प्रभागात अध्यक्षीय उमेदवाराला किती मते मिळाली आहे, याचा अंदाज येणार नाही.

(३) मतमोजणीच्या प्रत्येक फेरीनंतर निकाल जाहीर करावेत व त्यानुसार राज्य निवडणूक आयोगाकडे अहवालही पाठवावा. राज्य निवडणूक आयोग मतमोजणीच्या दिवशी व रात्री विशेष कक्ष चालविणार आहे. त्यामुळे निकाल जसे लागतील त्याप्रमाणे रात्रीही माहिती कळवावी.

(४) जिल्ह्यातील स्थानिक, दैनिक वर्तमानपत्रांचे विभागीय व राज्य स्तरावरील वृत्तपत्रांचे प्रतिनिधी, वृत्तसंस्था, आकाशवाणी आणि इलेक्ट्रॉनिक मिडिया यांच्या अधिकृत प्रतिनिधींना जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या ओळखपत्रासह मतमोजणीच्या ठिकाणी उपस्थित राहता येईल. मतमोजणीच्या ठिकाणी अनावश्यक गर्दी होणार नाही, याची सर्व खबरदारी घेण्यात यावी.

( बी. जी. वीर )

सचिव, राज्य निवडणूक आयोग

**३६. मतपत्रिका बाद ठरवण्याची कारणे.–**

(१) (अ) मतपत्रिकेवर नोंदलेल्या मतांची संख्या ही भरावयाच्या जागांच्या संख्येपेक्षा अधिक असेल;

(ब) मतपत्रिकेवर कोणतेही मत नोंदविले नसेल;

(क) कोणत्याही एका उमेदवाराच्या नावापुढे एकापेक्षा अधिक मते नोंदवण्यात आली असतील.;

(ड) अनिश्चितीमुळे ती अग्राह्य ठरत असेल;

(२) मतपत्रिकेच्या कायदेशीरपणाविषयी [६][ राज्य निवडणूक आयुक्ताचा किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याचा] निर्णय अंतिम असेल; मात्र फक्त निवडणूक अर्जाद्वारे त्या जागेवर दावा करण्यात आला असता असा निर्णय फिरवता येईल.

**३७. पडताळणी.–**

[६][ राज्य निवडणूक आयुक्ताने किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने] प्रदत्त मते, मतदारांच्या यादीची खुणा केलेली प्रत किंवा मतपत्रिकांच्या स्थळप्रती यांची मोहोरबंद पाकिटे उघडता कामा नयेत. त्याने नियम ३१ अन्वये मतदान केंद्राध्यक्षाने सादर केलेले विवरणपत्र, मोजलेल्या मतपत्रिकांची संख्या, आणि बाद ठरवलेल्या, खराब झालेल्या मतपत्रिका व नियम २९ अन्वये कार्यवाही केलेल्या मतपत्रिका, तसेच, त्याच्या ताब्यातील न वापरलेल्या मतपत्रिका व प्रदत्त मतांची यादी यांच्या ताडून ते पडताळून पाहिले पाहिजे आणि नंतर त्याने उघडलेले प्रत्येक पाकीट पुन्हा बंद केले पाहिजे व त्यावर मोहोर लावली पाहिजे आणि प्रत्येक पाकिटावर त्यातील वस्तूचे वर्णन व ते ज्या निवडणुकीशी संबंधित आहे त्या निवडणुकीची तारीख नमूद केली पाहिजे.

**३८. विवरण –**

त्यानंतर [६][ राज्य निवडणूक आयुक्ताने किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने], पुढील गोष्टी नमूद करणारे एक विवरण तयार करुन ते प्रमाणित केले पाहिजे.

(१) नियम ३७ मध्ये निर्देश केलेल्या पडताळणीचा परिणाम;

(२) ज्या उमेदवारांना विधिग्राह्य मते देण्यात आली आहेत त्या उमेदवारांची नावे;

(३) प्रत्येक उमेदवारास देण्यात आलेल्या विधिग्राह्य मतांची संख्या;

(४) निवडून आलेल्या उमेदवाराचे नाव;

(५) विधिग्राह्य ठरवण्यात आलेल्या मतांची संख्या, आणि;

(६) देण्यात आलेल्या प्रदत्त मतांची संख्या,

आणि कोणत्याही उमेदवारास किंवा नियम ३४ अन्वये रीतसर प्राधिकृत करण्यात आलेल्या त्याच्या प्रतिनिधीस अशा विवरणाची प्रत किंवा त्यातील उतारा घेण्याची परवानगी दिली पाहिजे.

**३९. निवडणुकांचे निकाल जाहीर करणे-**

(१) निवडणूक झाल्यानंतर शक्य तितक्या लवकर, [६][ राज्य निवडणूक आयुक्ताच्या किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याच्या ] सहीने नगरपालिकेच्या, मुख्य कार्यालयात एखाद्या ठळक ठिकाणी नोटीस लावून प्रत्येक निवडणुकीचा निकाल जाहीर करण्यात आला पाहिजे; अशा नोटिशीत कोणत्याही व्यक्ती निवडून आल्या असल्यास त्यांची नावे, आणि लढवण्यात आलेल्या निवडणुकीच्या बाबतीत, प्रत्येक उमेदवारासाठी नोंदवण्यात आलेल्या मतांची संख्या नमूद करुन ती प्रमाणित करण्यात आली पाहिजे.

(२) पालिका सदस्य म्हणून निवडून आलेल्या व्यक्तींची नाव शक्य तितक्या लवकर शासकीय राजपत्रात प्रसिध्द करण्यात आली पाहिजेत.

## मतपत्रिकांची विल्हेवाट

**४०. निवडणुकीच्या कागदपत्रांची अभिरक्षा -**

निकाल जाहीर करण्यात आल्यानंतर, [६][ राज्य निवडणूक आयुक्ताने किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने], नियम ३७ व ३८ मध्ये निर्दिष्ट केलेली, पाकिटे व विवरण आणि निवडणुकीशी संबंधित असलेली अन्य सर्व कागदपत्रे आपल्या अभिरक्षेत ठेवली पाहिजेत.

**४१. निवडणुकीची कागदपत्रे सादर करणे व त्यांची पाहणी करणे.-**

मतपत्रिकांची पाकिटे- मग अशा मतपत्रिका मोजलेल्या असोत, बाद ठरवलेल्या असोत किंवा प्रदत्त असोत,- मतपत्रिकांच्या स्थळप्रतींची पाकिटे आणि मतदारांच्या यादीची खुणा केलेली प्रत ठेवलेली पाकिटे [६][ राज्य निवडणूक आयुक्ताच्या किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याच्या] अभिरक्षेत असतील, तेव्हा ती न्यायाधीशांच्या आदेशान्वये असेल त्याव्यतिरिक्त उघडता कामा नयेत आणि त्यांतील वस्तू तपासता कामा नयेत किंवा त्या सादर करता कामा नयेत; परंतु निवडणुकीशी संबंधित असलेली अन्य सर्व कागदपत्रे, महानगरपालिका विहित करील अशा शर्तीच्या आणि अशी फी भरण्याच्या अधीन,लोकांना पाहण्यासाठी खुली असतील; आणि कोणत्याही व्यक्तीस अशा शर्तींचे अनुपालन केल्यावर व अशी फी भरल्यावर अशा कागदपत्रांची किंवा त्यांच्या कोणत्याही भागाची प्रत किंवा प्रती मिळण्याचा हक्क असेल.१

**४२. निवडणुकीची कागदपत्रे नष्ट करणे.-**

नियम ४१ मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेली पाकिटे निवडणुकींशी संबंधित असलेली अन्य सर्व कागदपत्रे एक वर्षाच्या कालावधीपर्यंत ठेवून घेण्यात आली पाहिजेत आणि त्यानंतर ती, न्यायाधीशाने तद्विरुध्द दिलेल्या कोणत्याही निदेशांच्या अधीन राहून नष्ट करण्यात आली पाहिजे.

## सर्वसाधारण तरतुदी

**४३. मतदारांच्या यादीतील मुद्रण प्रमादांकडे, किंवा लेखन प्रमादांकडे दुर्लक्ष करण्याचा [६][ राज्य निवडणूक आयुक्ताच्या किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याच्या] किंवा मतदान केंद्राध्यक्षाचा अधिकार.-**

मतदारांच्या यादीतील एखादी नोंद विवक्षित व्यक्तीसंबंधी आहे किंवा कसे याविषयी या नियमान्वये [६][ राज्य निवडणूक आयुक्ताने किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने] किंवा मतदान केंद्राध्यक्षाने निर्णय देण्याचा प्रश्न उपस्थित झाल्यास, आयुक्तास किंवा यथास्थिती, मतदान केंद्राध्यक्षास,

मतदारांच्या यादीत कोणताही लेखन प्रमाद किंवा मुद्रण प्रमाद असला तरी, उक्त नोंद उक्त व्यक्तीसंबंधी आहे किंवा नाही याविषयी त्याची कारणे लेखी नमूद करुन निर्णय देता येईल.

**[६][४४. महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती आणि नियोजन करण्याचे राज्य निवडणूक आयुक्ताचे अधिकार.–**

राज्य निवडणूक आयुक्त, मतदार याद्या तयार करणे, प्रभागरचना करणे व महानगरपालिकेच्या नियमाप्रमाणे निवडणूक घेणे यासाठी महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारीवर्ग यांना नेमू शकतो व त्यांचे नियोजन करु शकतो व ते अधिकारी व कर्मचारी वर्ग राज्य निवडणूक आयुक्ताच्या अधिक्षणाखाली, मार्गदर्शनाखाली व नियंत्रणाखाली आपली कामे करतील.]

**४५. अडचणीच्या प्रसंगी [६][ राज्य निवडणूक आयुक्ताचे किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याचे] अधिकार.–**

या अधिनियमान्वये  कोणतीही निवडणूक घेण्याच्या बाबतीत कोणतीही अडचणी उद्भवल्यास, [६][राज्य निवडणूक आयुक्तास किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास], निवडणूक योग्य रीतीने घेण्यासाठी त्यास आवश्यक वाटेल अशी अधिनियमाशी किंवा नियमाशी विसंगत नसलेली कोणतीही गोष्ट करता येईल.

**४६. [६][राज्य निवडणूक आयुक्त किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने] दिलेले निर्णय अंतिम असणे.–**

कलम १६ [२][*] च्या तरतुदींच्या अधीन, ६[राज्य निवडणूक आयुक्ताने किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने], या प्रकरणातील नियमान्वये त्यास देण्यात आलेल्या अधिकारांन्वये दिलेले सर्व निर्णय अंतिम असतील]

# नमुने

## नमुना 'अ'

**(प्रकरण १, नियम ९ पहा)**

**नामनिर्देशन पत्र**

प्रभागाचे नाव व क्रमांक .........................................................

उमेदवाराचे नाव .....................................................................

वडिलांचे / पतीचे नाव ........................................................

वय ................................................

व्यवसाय .........................................

पत्ता .....................................................

ज्या प्रभागातील मतदारांच्या यादीत उमेदवाराचे नाव
समाविष्ट करण्यात आले तो प्रभाग .................................................

प्रभागाच्या मतदारांच्या यादीतील
उमेदवाराचा क्रमांक ................................................

[६] [जमात व जात

(ही माहिती फक्त महिला उमेदवार ज्या अनुसूचित जातींच्या किंवा अनुसूचित जमातींच्या किंवा इतर मागासवर्गीय असतील) ही माहिती अनुसूचित जातीच्या किंवा अनुसूचित जमातीच्या किंवा इतर मागासवर्गीय अशा उमेदवारांनी निवडणूक राखून ठेवलेल्या जागेसाठी असेल त्यावेळी भरावी. जर निवडणूक ही महिलांसाठी राखीव असलेल्या जागेसाठी असेल.]

सूचकाचे नाव .......................................................

प्रभागाच्या मतदारांच्या यादीतील सूचकाचा क्रमांक .......................................

सूचकाची सही ............................................................

अनुमोदकाचे नाव ......................................................

प्रभागाच्या मतदारांच्या यादीतील अनुमोदकाचा क्रमांक ...................................

अनुमोदकाची सही ...............................................

## उमेदवाराचे प्रतिज्ञापत्र

मी, याद्वारे असे प्रतिज्ञापन करतो की, हे नामनिर्देशनपत्र मला मान्य आहे.

दिनांक.............................................................................उमेदवाराची सही

{(ही माहिती राज्य निवडणूक आयुक्ताने प्राधिकृत केलेल्या अधिका-याने करावी.)}

-----------

## स्वाधीन केल्याबाबत प्रमाणपत्र

अनुक्रमांक

हे नामनिर्देशनपत्र दिनांक ------------ रोजी -----------------------------वाजता माझ्या कार्यालयात माझ्या स्वाधीन करण्यात आले.

{राज्य निवडणूक आयुक्ताने प्राधिकृत केलेल्या अधिका-याची सही}

----------------------------------